


धन्वंतरी जयंतीनिमित्त शुभेच्छा!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com

शुक्रवार, दि.१० नोव्हेंबर २०२३

वर्ष : २२ वे | अंक : ४३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## मराठा कुणबी जात पुराव्यासाठी नोंदी युध्दपातळीवर

# आठ लाख कागदपत्रांची तपासणी; २४ हजार २७ पुरावे आढळले

- जिल्हा प्रशासनात सर्व पातळीवर तपासणी मोहीम जोमात
- बार्शी आघाडीवर; जिल्हाधिकाऱ्यांनी केली पंढरपूर कक्षाची तपासणी

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात मराठा कुणबी जातीचे पुरावे तपासणीची विशेष मोहीम युद्धपातळीवर सुरू झाली आहे.निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समिती कक्षातील अधिकाऱ्यांनी कक्षाची स्थापना झाल्यापासून आज अखेर ७ लाख ८४ हजार कागदपत्रांची तपासणी केली आहे. यामध्ये २ हजार ४२७ कुणबी नोंदीचे पुरावे आढळून आले आहे. बार्शी तालुक्यात सर्वाधिक १५३४ नोंदी आढळून आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे यांनी दिली.

### मराठा समाज देणार भाषा आनुवादक

महसुली अथवा संस्थांनाच्या कागदपत्रांमध्ये असलेल्या नोंदी मोडी लिपीमध्ये आहेत, ही लिपी अवगत असणारे कमी लोक आहे. त्यांचा शोध मराठा समाजाने घेतला आहे. जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या मोडी लिपीतील समजणारे भाषा अनुवाद मराठा समाजास देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे.

### पंढरपुरात जिल्हाधिकाऱ्यांनी केली अभिलेख कक्षाची पाहणी

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपुरातील तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षाची पाहणी केली. अभिलेख कक्षा मध्ये स्वत: थांबून जन्म आणि मृत्यूच्या नोंदीचे रजिस्टर पाहिले. जन्ममृत्यू रजिस्टर पाहणी करत असताना त्यांनी आत्तापर्यंत सापडलेल्या सर्व नोंदींचा आढावा घेऊन मूळ नोंदवही पाहिल्या. तपासणीची पाहणी करत असताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः समिती कक्षाकडून राहून गेलेल्या मोडी लिपीतील कुणबी जातीच्या नोंदी शोधून कक्षाच्या निर्देशनास आणून दिल्या. व हे अभिलेखे व्यवस्थित ठेवण्याचे निर्देश दिले.



शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तहसिल कार्यालयात कुणबी मराठा जात पुरावे तपासणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हे तपासणीचे काम जोरात चालू आहे. सोलापूर जिल्ह्यात जन्म मृत्यू आणि महसुली अभिलेख अशा तब्बल सात लाख ८४ हजार कागदपत्राची तपासणी केली आहे. यामध्ये २४४७ नोंदणी आढळून आल्या आहे. बार्शी तालुक्यात सर्वात जास्त १५३४ नोंदणी आढळून आल्या आहेत.

### संस्थांच्या कागदपत्रांची तपासणी होणार

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट, मंगळवेढातील पटवर्धन यांच्या सह अनेक संस्थाने होती या संस्थांनाकडे देखिल कुणबी नोंद असल्याचे बोलले जात आहे. गुरूवारी सकल मराठा समाजाच्या सोलापूर जिल्ह्यातील समन्वयक जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या संदर्भात तपासणीची मागणी केली. त्यावर प्रशासनाचे या कागदपत्रांची तपासणी करणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

## डीसीसी बँक : चौकशीच्या मुदतवाढीस कोर्टाचा नकार

■ ॲड.सागर रोडे यांनी दिली माहिती

बार्शी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या तत्कालिन संचालक मंडळाचे कलम ८८ चे चौकशीस मुदतवाढ देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला असल्याची माहिती ॲड.सागर रोडे यांनी दिली.

रोडे म्हणाले, सोलापूर डीसीसी बँकेच्या तत्कालीन संचालकांविरुध्द सहकार कायदा कलम ८८ अन्वये सुरु असलेली चौकशी सहा महिन्यांचे आत पूर्ण करावी असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी दाखल केलेल्या याचिका क्र. ११९१०/२०१३ चे अनुषंगाने २१ एप्रिल २०२३ रोजी दिले होते. तथापि, सदरचे सहा महिने दि. २१ ऑक्टोबर २०२३ रोजी पुर्ण होवुनही कलम ८८ ची चौकशी पुर्ण झाली नाही. त्यामुळे विभागीय सह निबंधक पुणे यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे पुन्हा एक वर्ष मुदतवाढ मिळणेसाठी अर्ज केला होता. सदर अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालय येथे झाली. मुदतवाढीचे अर्जास आमदार राऊत यांचेतर्फे विरोध करणेत आला. चौकशी अधिकारी यांनी गेल्या सहा महिन्यात फक्त ५ वेळा सुनावणी घेतलेली आहे व ते मुद्दाम वेळकाढुपणा करीत असुन संचालकांना नोटीस बजावणी शिवाय अन्य कोणतेही कामकाज, चौकशी अधिकारी यांनी केले नाही. त्यामुळे आता त्यांना मुदतवाढ देण्यात येवु नये. तसेच यापुर्वी उच्च न्यायालयाने आदेश देताना कायद्यातील तरतुदीनुसार चौकशीचा कालावधी जरी अडीच वर्षे असला तरी बँकेच्या हिताचे दृष्टीने चौकशी सहा महिन्यात पुर्ण करा असा आदेश दिला असताना आता पुन्हा मुदतवाढ मागता येणार नाही असा युक्तिवाद आमदार राऊत यांचेतर्फे ॲड. रोडे यांनी केला.



त्याचा विचार करुन उच्च न्यायालयाने सह निबंधक म सह. संस्था पुणे यांचेतर्फे कलम ८८ अन्वये चौकशीस मुदतवाढ देण्यास नकार देवून यापूर्वी ज्या कोर्टाने आदेश दिलेला आहे. त्याच कोर्टामध्ये पुनर्विचार याचिका दाखल करु शकता असे म्हणुन चौकशीस मुदवाढ देण्यात आलेली नाही.

## शेगाव दुमाला येथे एसटीच्या धडकेने उत्तर प्रदेशचा मजूर ठार

सुराज्य/पंढरपूर

रात्रीच्या सुमारास रस्ता ओलांडत असताना वेगाने जाणाऱ्या एसटीच्या धडकेने उत्तर प्रदेशातील ४० वर्षाय मजूर गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात पंढरपूर ते शेटफळ मार्गावरील शेगाव दुमाला येथे सुमारास घडला.

रामअवतार सोनपाल सिंग (वय ४० रा. उत्तर प्रदेश,सध्या रा.शेगाव दुमाला ता. पंढरपुर) असे मयताचे नाव आहे. तो काल रात्री आठ वाजेच्या सुमारास शेगाव दुमाला येथे रस्ता ओलांडत होता. त्यावेळी बीड ते पंढरपूर कडे जाणारी एमएच१४-बीटी- ३०९६ या क्रमांकाचे एसटी समोरून धडकल्याने तो जखमी होऊन मरण पावला. या अपघाताची फिर्याद मयताचा पुतण्या कन्हैया मुखरामसिंग याने पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एसटीचा चालक आरिफ युसूफ शेख (रा.पंढरपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक ओलेकर पुढील तपास करीत आहेत.



वसुबारसने गुरुवारी दीपोत्सवास प्रारंभ झाला. सोलापुरातील विविध गोशाळांमध्ये गायींची आणि वासरांची सौभाग्यवतींनी मनोभावे पूजा केली.

## पिंपरी येथे कोयत्याने मारहाण; महिलेसह तिघांवर गुन्हा

सुराज्य/वैराग

भावकितील घर जागेच्या वादातून कोयता, दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत २४ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना पिंपरी (ता.बार्शी) येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

अमोल वसंत काळे (वय २४ रा.पिंपरी) असे जखमीचे नाव आहे. या प्रकरणात वैरागच्या पोलिसांनी लाला आप्पा काळे, त्याची पत्नी रेणुका आणि भाऊ राजेंद्र काळे (सर्व रा. पिंपरी) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. तिघेजण जखमीच्या घरासमोर येऊन तुझ्या घराची पाणीपट्टी भरपूर आली आहे. ती भरून घे असे म्हणत भांडण केले. त्यावेळीं जखमी अमोल याने जागा माझ्या नावावर नाही. मी नळपट्टी भरणार नाही. असे सांगितले त्यावेळी दोघांनी त्यांना कोयता आणि दगडाने तोंडावर मारून जखमी केले. तर रेणुका हिने शिवीगाळ केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

## वडिलांचा खून; मुलीसह तिघे निर्दोष

सुराज्य/सोलापूर

प्रेम प्रकरणाच्या आड येणाऱ्या वडिलांचा दगडाने मारून खून करून पुरावा नष्ट करण्याच्या प्रयत्न केल्याच्या आरोपातून मयताची मुलगी महानंदा सिद्धप्पा पुजारी, तिचा प्रियकर देवप्पा हनुमंत पुजारी आणि सुनील उमेश पवार (सर्व रा.शावळ ता.अक्कलकोट) यांना गुन्हा शाबित न झाल्यामुळे निर्दोष मुक्त करण्याचा आदेश प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम.एस.आझमी यांनी नुकताच दिला आहे.

## मुगळी येथे सळईने मारून डोके फोडले; तिघांविरुद्ध गुन्हा

अक्कलकोट : समाईक विहीरीच्या वादातून लाथाबुक्क्या आणि सळईने मारहाण करून डोके फोडल्याची घटना मुगळी (ता.अक्कलकोट) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.

या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



कल्लप्पा भीमराव सरसंबी (वय ५२ रा. मुगळी) असे गंभीर जखमीचे नाव आहे. त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी काशिनाथ शंकर रिवूरे त्याचा भाऊ गुरुशांत रेवूरे आणि अण्णाप्पा चनबसप्पा रेवूरे (सर्व रा.मुगळी) या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल सकाळी ८ वाजेच्या सुमारास जखमी कल्लप्पा सरसंबी हे आरोपीच्या घरासमोरून जात होते. त्यावेळी तिघांनी त्यांना रस्त्यात अडवले. आणि विहीरीतील पाणी वापरू नये, तसेच शेतात येऊ नये या कारणावरून दोघांनी त्यांना खाली पाडले. तर गुरुशांत याने सळईने मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार कोळी पुढील तपास करीत आहेत.

## न्यूझीलंडचा श्रीलंकेविरुद्ध विजय | भारतासोबत खेळणार उपांत्य फेरीचा सामना

बंगळुरु : न्यूझीलंडने एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या ४१ व्या सामन्यात श्रीलंकेचा ५ गडी राखून पराभव करून पॉइंट टेबलमध्ये पाचव्या क्रमांकावर असलेल्या पाकिस्तानसाठी मोठी समस्या निर्माण केली आहे. न्यूझीलंडच्या विजयासह पाकिस्तानच्या उपांत्य फेरीत जाण्याच्या आशा जवळपास संपुष्टात आल्या आहेत. या विजयासह न्यूझीलंडचे १० गुण झाले आहेत. पराभूत झालेला श्रीलंका यापूर्वीच स्पर्धेतून बाहेर पडला होता. भारतीय संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर विराजमान आहे. चौथ्या क्रमांकावर असणाऱ्या न्यूझीलंडसोबत इंडियाचा सेमीफायनल सामना होणार आहे. १५ नोव्हेंबर रोजी वानखेडे स्टेडियमवर भारत आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये उपांत्य फेरीचा सामना होईल. पाकिस्तानने चमत्कार केला नाही तर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पहिला सेमीफायनलचा सामना होईल.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांचे परस्पर चांगले पटते, असे वाटायचे!


कल्याण
257-40-479

मुंबई
256-30-460


# दिवाळीसाठी सरसकट ६ हजार सानुग्रह बोनस

## ■ एसटीचे अधिकारी-कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार

सुराज्य/सोलापूर

**राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचे कर्मचारी आणि अधिकारी यांना दिवाळीसाठी सरसकट ६ हजार रुपयांचा सानुग्रह बोनस जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी आता गोड होणार आहे.**

परिवहन मंत्री उदय सामंत यांनी यासंदर्भात माहिती दिली. मागील अनेक महिन्यांपासून तोट्यात असणाऱ्या एसटीची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारत असल्याचे चित्र आहे. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय देखील शासनाकडून घेण्यात आले आहेत. तसेच एसटी महामंडळास स्व-मालकीच्या गाड्या खरेदी करण्यासाठी यंदाच्या वर्षी ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

सामंत आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत बैठक पार पडली या बैठकीमध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार खात्याअंतर्गत बढतीसाठी आवश्यक असणारी २४० दिवसांची अट रद्द होईपर्यंत सदर बढतीस स्थगिती देण्यात येईल. त्याचप्रमाणे सातवा वेतन आयोगानुसार वेतन देण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२३ पूर्वी सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाशी बैठक घेऊन निर्णय देण्यात येईल.

या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आलीये. कॅशलेस मेडिक्लेम योजनेसाठी तालुका आणि जिल्हास्तरावर रुग्णालयांची निवड करण्यात येईल. या रुग्णालयामध्ये एसटी कर्मचाऱ्यांची बिले महामंडळ देय करणार आहे. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, वेतन वाढीचा दराची थकबाकीबाबत ३० नोव्हेंबरपूर्वी निर्णय घेण्यात येईल. जवळपास दोन वर्षांपूर्वी एसटी महामंडळाचे विलिनीकरण, सातवा वेतन आयोग, आदींसह विविध मागण्यांसाठी संप पुकारण्यात आला होता. एसटी कर्मचाऱ्यांच्या या उत्स्फुर्त संपात गुणरत्न सदावर्ते यांनी उडी घेतली. या संपानंतर एसटी कर्मचाऱ्यांची संघटना त्यांनी सुरू केली. पण आता एसटी कर्मचाऱ्यांबाबत अनेक सकारात्मक निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात येत असल्याचं चित्र आहे. त्यामुळे यंदाची एसटी कर्मचाऱ्यांची दिवळी गोड होणार असल्याचं म्हटलं जातंय.



### सातव्या वेतनाची मागणी

दरम्यान गुणरत्न सदावर्ते यांनी काही दिवसांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांना सातवे वेतन आयोग लागू करण्यासाठी एसटी बंदची हाक दिली होती. परंतु त्यांच्या या हाकेला फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे चित्र होते. मात्र आंदोलनावर भाष्य करताना सदावर्ते म्हणाले, आंदोलन सुरू करण्याआधी या सरकारने आम्हाला चर्चेसाठी बोलवले आहे. त्याचप्रमाणे या संपात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी आणि कामगार सहभागी होणार असल्याचा दावा करण्यात येत होता. परंतु तो दावाही फोल ठरल्याचे पाहायला मिळाले.

